Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - “ Pedagogy And Teaching Learning ”

# प्रगत अध्यापनशास्त्र व उपाय

प्रा. सौ. आर. डी. बरकले,
सहाय्यक प्राध्यापिका,
ॲड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविदयालय,
नाशिक.

**प्रास्ताविक :**

शिक्षणप्रक्रियेत अध्यापन व अध्ययन हे दोन शब्द प्रमुख आहेत. शिक्षणाचे शाळा व महाविदयालयातील मुख्य कार्य हे अध्यापनाशी निगडीत असते नव्हे अध्यापन हे प्रमुख कार्य शिक्षकाला करावेच लागते. त्यातूनच खरा शिक्षक ओळखला जातो. परंतु अध्यापन ही एक कला आहे ही कला ज्या शिक्षकाने आत्मसात केली तोच शिक्षक आपल्या पेशात यशस्वी ठरतो. अर्थात अध्यापन शास्त्राचा अभ्यास करतांना अनेक गोष्टींचा व संकल्पनांचा विचार करावा लागतो. शिक्षक अध्यापन करत असतांना इतके महत्त्वाचे कार्य करतात की बालकामध्ये अनेक बदल घडून येतात म्हणून असे म्हटले जाते की, बालकाच्या जडणघडणीत शिक्षकाचा सिंहाचा वाटा असतो.

शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये वेगवेगळे विचार आहेत पूर्वी शिक्षककेंद्री अध्यापन पध्दती होती म्हणजे शिक्षकाला जो विषय वाटेल तो विषय किंवा तो भाग शिक्षक विदयार्थ्यांना अध्यापन करावा असे वाटेल तो करत असे नंतर विषयकेंद्री अध्यापन पध्दतीला महत्त्व प्राप्त झाले. आज मात्र या पध्दती मागे पडून बालककेंद्री अध्यापन पध्दतीचा स्विकार मानशास्त्रज्ञांनी केला आहे. यामध्ये अध्ययन कर्त्याला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. विदयार्थ्यांना जीवन जगण्यास योग्य असे अध्ययन अनुभव देणे क्रमप्राप्त ठरते. बदलत्या वातावरणात, परिस्थितीत कृतीशील सहभागी होण्यास प्रवृत्त करणे हेच शिक्षकाने अध्यापन शास्त्रातून साध्य केले पाहिजे.

प्रगत अध्यापनशास्त्र वर नमूद केल्याप्रमाणे बालकाला जर शिक्षणात प्रमुख स्थान दिले असेल तर त्यामुळे अध्ययन हा भाग महत्त्वाचा आहे. या अध्ययन कर्त्याला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते हा विचार करुन शिक्षकाने अध्यापन केले पाहिजे. तसेच जो विषय अध्यापन करावयाचा आहे त्यासंदर्भात काही शैक्षणिक साधने तयार करणे आवश्यक असते. विदयार्थ्यांच्या भावभावना, अध्ययनावर परिणाम करणारे घटक व अध्ययनासाठी योग्य वातावरण तयार करणे हा सर्व भाग प्रगत अध्यापनशास्त्रामध्ये अभिप्रेत आहे. तसेच शिक्षणाचा केंद्रबिंदू म्हणजे अध्ययन आणि त्यासाठीच अध्यापन करणे. ज्या अध्यापनातून विदयार्थ्यांचे अध्ययन व्यवस्थित होते तेच अध्यापन महत्त्वाचे असते व त्यालाच अध्यापनशास्त्र असे म्हटले आहे.

आजकाल बेसुमार विदयार्थी संख्या ही एक महत्त्वाची व गंभीर समस्या आहे. त्यामुळे शिक्षकाला अध्यापन कार्यात अनेक समस्या निर्माण होतात यात प्रामुख्याने वर्गव्यवस्थापन, वैयक्तिक मार्गदर्शन, परीक्षा, स्वाध्याय तपासणे, वर्ग शिक्षक म्हणून काम करतांना अशा प्रकारच्या अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या सर्व अडचणींपेक्षा शिक्षकाचे अध्यापन आणि विदयार्थ्याचा सहभाग म्हत्त्वाचा असतो. परंतु त्यातही अनेक अडचणी

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

येत असल्याने त्या सोडविण्यासाठी व आपले अध्यापन प्रभावीपणे करुन विदयार्थ्यांनी सक्रिय रहावे यासाठी खालीलप्रमाणे नवनवीन पध्दतींचा वापर करता येईल. यात प्रमुख्याने

१. सांघिक अध्यापन
२. तंत्रज्ञानाधिष्ठित
३. मूल्याधिष्ठित
४. पर्यावरणावर आधारित
५. विविध प्रतिमाने
६. पारंपारिक पध्दती

**१) सांघिक अध्यापन :**

विदयार्थ्यांचे अध्ययन कसे होते हे पाहण्याचा अनेक प्रयत्नातून उदयास आलेले एक अध्यापन म्हणजे सांघिक अध्यापन. उशिरा का होईना परंतु आता हे तंत्र भारतात प्रसारित होत आहे.

सांघिक अध्यापन हे दोन / अधिक शिक्षकांनी एकत्र येऊन आपल्या कौशल्याम्च्या आधारे विविध तंत्राचा अवलंब करुन अध्यापनासाठी नियोजन करणे व त्यानुसार लवचिकता राखून त्याचा अवलंब करणे.

यालाच सहकार्यात्मक अध्यापन असे देखिल म्हणता येईल कारण यात प्रत्येक शिक्षक समान विदयार्थ्यांच्या समूहास अध्यापन करण्यासाठी स्त्रोत, अभिरुची आणि तज्ज्ञता एकत्रित करण्याचा प्रयत्न करतो. तसेच सांघिक अध्यापनात विदयार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांच्या गरजांचे समाधान करण्यासाठी व त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी एकत्रितपणे अध्यापन करावे लागे.

**२) तंत्रज्ञानावर आधारित पाठ :**

आजच्या काळात तंत्रज्ञानाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. कॉम्प्युटरच्या युगात अनेक महत्त्वाची माहिती क्षणात आपलाला मिळते या ज्ञानाचा फायदा विदयार्थ्यांना करुन देण्यासाठी शिक्षकाने तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. विदयार्थ्यांना भरपूर व चांगली माहिती देणे हे शिक्षकाचे कर्तव्य आहे. त्यासाठी त्यांनी तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे.

**३) मूल्याधिष्ठित पाठ :**


शिक्षक वर्गात विदयार्थ्यांना अध्यापन करतात त्यावेळेला फक्त परीक्षेची घोकंपट्टीच करतात असे नाही तर शाळेत अनेक मूल्ये विदयार्थ्यांम्ध्ये परावर्तीत होत असतात व त्यासाठीच विदयार्थी शाळेत येतो असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ही मूल्ये कोणती? तर संवेदनशीलता, समानता, व्यवस्थितपणा, राष्ट्रभक्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन, राष्ट्रीय एकात्मता ही सर्व मूल्ये शालेय पुस्तकांच्या पाठांतून विदयार्थ्यांना

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

अध्यापन केले जातात. तसेच शिक्षक सुध्दा आदर्शांच्या स्वरुपात विदयार्थ्यांसमोर उभे असतात. मग ही मूल्ये कोणती? त्यातून विदयार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व कसे विकसित होते हे शिक्षक शाळेत विदयार्थ्यांना समजावून सांगतात म्हणून मूल्याधिष्ठित पाठ महत्त्वाचे आहेत.

**४) पर्यावरणावर आधारित पाठ :**

आज देशासमोर अनेक समस्या आहेत त्यात सर्वात महत्त्वाची समस्या म्हणजे पर्यावरण समस्या. लोकसंख्या वाढीचा दुष्परिणाम म्हणून पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे व विविध आजारांना बालक व वृध्दांना सामोरे जावे लागत आहे. पर्यावरणाचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे यासाठी शालेय जीवनातूनच तसे प्रयत्न करावे लागतात व शाळा तो प्रयत्न करण्यात यशस्वी ठरत आहे. यामध्ये शरीराची स्वच्छता, परिसराची स्वच्छता, चांगले आरोग्य या सर्वांचे शिक्षण शाळेत दिले जात आहे तसे पाठयांशही आहे त्याचा बालकांच्या मनावर चांगला परिणाम होतांना दिसतो. शिक्षकाने शक्य असेल त्या ठिकाणी या सर्व गोष्टींचा उल्लेख वर्गात करणे आवश्यक आहे म्हणून पर्यावरणाचे पाठ महत्त्वाचे आहेत.




वरील सर्व गोष्टी साध्य करावयाच्या असतील तर पर्यावरणाचे पाठ विचारात घेऊन अध्यापन

केलेच पाहिजे.

५) **प्रतिमानावर आधारित पाठ :**

विदयार्थ्याला अध्यापन करतांना कोणत्या पध्दतीने अध्यापन करता येईल याचा विचार करतांना विदयार्थी अध्ययन कसे करतील याला महत्त्वाचे स्थान दिले आहे यावेळी विदयार्थ्याला जर केंद्रस्थानी मानावयाचे असेल तर वेगवेगळया अध्यापन पध्दतीचा शोध लागला व त्याचबरोबर प्रतिमानांचाही विचार केला जाऊ लागला. यामध्ये विदयार्थी महत्त्वाचा म्हणून काही अध्यापनाची प्रतिमाने उदयास आली. उदा. अग्रत संघटक प्रतिमान, पृच्छा प्रतिमान, सृजनशील प्रतिमान, संकल्पना प्राप्ती प्रतिमान अशा अनेक प्रतिमानांचा शिक्षकांनी वर्गात वापर करुन अध्यापन करावे अशी अपेक्षा आहे. प्रत्येक प्रतिमानाची वैशिष्टयेही वेगवेगळी आहे मात्र अध्ययनाशी प्रतिमानाचा अगदी जवळचा संबंध आहे हे निश्चित.

६) **पारंपारिक अध्यापन :**

अध्यापनाची अतिशय जुनी पध्दती म्हणजे पारंपारिक अध्यापन पध्दती होय. यामध्ये शिक्षकांचे प्रभावी निवेदन, फलक लेखन, शैक्षणिक साहित्याचा वापर, प्रश्न कौशल्य या सर्व कौशल्यांचा समावेश करुन शिक्षक वर्गात प्रभावी अध्यापन करण्याचा प्रयत्न करतात. अध्यापनाची ही अतिशय चांगली व सोपी पध्दती आहे. सरावाने ती सहज शक्य होते.

**अध्यापनशास्त्राचा विचार करतांना अध्ययन चांगले होण्यासाठी शिक्षक म्हणून तुम्हाला कोणते प्रयत्न करता येतील?**

१. तंत्रज्ञानाचा वापर करुन वर्गात अध्यापन करण्याचा प्रयत्न करावा. शाळेत तशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात.
२. अध्यापन करतांना विषयानुरुप दैनंदिन जीवनाशी सांगड घालणे आवश्यक आहे.
३. वर्गात सर्वच विषय अध्यापन करतांना वेगवेगळया अध्यापन पध्दतींचा उपयोग करावा व इतिहास विषय जास्तीत जास्त नाटयीकरण पध्दतीने अध्यापन करावा.
४. वर्गात सर्वच विषय शिकवितांना वेगवेगळया शक्य असल्यास शैक्षणिक साधनांचा वापर करावा.
५. विषय शिकवितांना पूर्वज्ञानाशी सांगड घालावी.
६. स्वयंअध्ययनासाठी पोषक वातावरण निर्माण करावे.
७. कृतीयुक्त अध्यापन पध्दतीचा वापर करावा.
८. विदयार्थ्यामधील ज्ञान व कौशल्ये समजण्यासाठी प्रश्न कौशल्यांचा व प्रबलनाचा वापर करावा.
९. विज्ञान विषय व इतर विषयांसाठी सुध्दा सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात याव्यात.
१०. अंधश्रध्दा निर्मूलन यासाठी रॅली काढून जनजागृती करावी.
११. विदयार्थ्यांच्या समस्या समजून घेण्यासाठी पालक शिक्षक सभा दरमहा आयोजन करावे.

१२. अभ्यासात व इतर क्षेत्रातही मागे असलेल्या विदयार्थ्यांसाठी उपचारात्मक अध्यापन पध्दतीचा वापर प्रत्येक शिक्षकाने करावा.
१३. विदयार्थ्यांच्या विविध कला गुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धा आयोजित कराव्यात.
१४. शालेय स्तरावर किमान वर्षातून एक वेळेस सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करावे.
१५. विदयार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागावा यासाठी वर्गावर्गातून त्यांना प्रत्येकाला त्यांच्या आवडीच्या विषयावर माहिती सांगण्यास प्रवृत्त करावे.
१६. वर्गात शुल्लककारणावरुन विदयार्थ्याला खूप मोठी शिक्षा किंवा रागावणे हे शिक्षकने टाळावे.
१७. सर्वांना समान वागणूक दयावी.
१८. शिक्षक स्वतः सर्वगुणसंपन्न असावा. तसेच शिक्षकांनी स्वतः आदर्शाच्या रुपात उभे राहावे.
१९. दैनंदिन जीवनात घडणाऱ्या चांगल्या वाईट घटनांची विदयार्थ्यांना माहिती दयावी.
२०. १० वी फ, तानी यासारखे शैक्षणिक चित्रपट दाखवावेत.
२१. आदर्श व्यक्तींचे जीवनचरित्रे विदयार्थ्यांना अध्यापन करावे.
२२. वर्गामध्ये प्रश्नकौशल्य वापरल्यानंतर योग्य त्या प्रबलनाचा वापर करावा.
२३. स्पर्धा घेतल्यानंतर बक्षिसे व पारितोषिके देतांना त्यामागील भावना समजून सांगावी व शाळा हे एक कुटूंब आहे म्हणुन कुटूंबात आनंद साजरा कसा करावा हे समजून सांगावे.

**फायदे :**

१. विदयार्थ्यांची स्मरणशक्ती व आकलनक्षमता वाढते.
२. विदयार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळतो.
३. विदयार्थ्यांचा भावनिक, शारीरिक, मानसिक विकास होतो.
४. विदयार्थ्यांच्या वेगवेगळया क्षमता शिक्षकांना समजतात.
५. आपला पाल्य शाळेत कसे अध्ययन करतो, कोणकोनत्या क्षेत्रात पुढे आहे हे पालकांना समजते.

**समारोप :**

सारांश अध्यापन ही एक कला आहे परंतु विदयार्थ्यांनी जर वर्गात अध्ययन केले तर ती कला वृध्दिंगत होते यासाठी शिक्षकांनी कोणकोणते प्रयत्न केले पाहिजे हा या लेखाचा मुख्य हेतू आहे.